**साक्षीदार क्र. १**

**मी याव्दारे प्रतिज्ञेपुर्वक निवेदन करतो की,**

**नाव : जयश्री अंबादास एकनार,**

**वय : २६ वर्ष, धंदा: घरकाम,**

**रा. चितेगाव, ता. पैठण, जि. संभाजीनगर.**

**साक्षीदाराचा सरतपास सरकारी विधिज्ञ श्री. आर. के. शिंदे यांचेमार्फत सुरू :**

संतोष एकनार हा माझा लहान दिर आहे. गोरख हे माझे सासरे असुन सुनिता ही माझी सासु आहे. कमलबाई ही माझी मोठी सासू आहे. मी राहण्यासाठी माझ्या आई-वडीलांकडे असुन मी माझ्या आई वडीलांकडे माझी आई-वडील व भावासह रहाते. माझे लग्न २ फेब्रुवारी २०१३ मध्ये अंबादास सोबत झाले होते. मला एक मुलगा विठ्ठल व एक मुलगी शिवन्या आहे. माझे पती एक वर्षापुर्वी मयत झाले. माझी मुले सासु-सास-याकडे आहेत. मी मुलांचा ताबा मिळणेबाबत कोर्टात आले होते. दि. ०१.०३.२०२५ रोजी दुपारी १.३० मिनीटांच्या सुमारास समोरचे वकिल व आमचे वकिल आले होते. त्यांनी मला मुलांना भेटण्याबाबत व बोलण्याबाबत सांगितले होते. मी माझ्या मुलांना भेटण्यासाठी जात असताना न्यायालयाच्या गेटजवळील बाकडाजवळ संतोषने माझ्या बगलेत हात घालुन, मागे ओढून मला जिवे मारण्याची धमकी दिली. संतोषने मला जेव्हा स्पर्श केला तेव्हा मला लज्जा उत्पन्न झाली. गोरखने मला हात पिरगळुन, घ ाण घाण शिवीगाळ केली व म्हणाला की, मुलांसोबत तुला बोलू देणार नाही असे म्हणुन गोरखने मला जिवे मारण्याची धमकी दिली. माझ्या सासूने व मोठया सासूने मुलांना मागे ओढून मला शिवीगाळ करून, जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर आम्ही तेथुन नेवासा पोलीस स्टेशनला गेलो. तेथे जावून आम्ही गुन्हा दाखल केला. आता मला माझी फिर्याद दाखविण्यात आली. ती तीच असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. सबब फिर्यादीस **नि. २८** देण्यात येते. आज रोजी आरोपी क्र.२ न्यायालयात हजर आहेत. मी न्यायालयात भा.न्या.सं.कलम १८३ प्रमाणे जबाब नोंदविला होता. आता मला तो जबाब दाखविण्यात आला. तो तोच असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तो जबाब माझ्या सांगण्याप्रमाणे आहे. सबब सदरील जबाबास **नि. २९** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण,**

**मध्यांनाची वेळ झाल्यामुळे पुढील उलटतपास तहकुब..**

श्रवणोत्तर स्विकृती,

PRANITA RITESH SUGAONKAR Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR Date: 2025.11.24 16:51:41 +0530

दिनांक :- २४/११/२०२५

(डॉ. पी. आर. सुगांवकर)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, नेवासा.

**मध्यांनानंतर शपथेवर सा.क्र.१ जयश्री अंबादास एकनार हिचा उर्वरीत उलटतपास आरोपीचे विधिज्ञ ॲड. श्री. ए. टी. आगळे यांचे मार्फत सुरु-**

हे म्हणणे खरे आहे की, मी संभाजीनगर न्यायालयात मुले ताब्यात मिळण्यासाठी आरोपी क्र.२ विरूध्द अर्ज दाखल केला होता. हे मला माहिती नाही की, त्यामध्ये आरोपी क्र.२ हा वकिला मार्फत हजर झाला होता. हे मला माहिती नाही की, माझा तो अर्ज न्यायालयाने कार्यक्षेत्राच्या मुद्यांवर रद्द केला. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मी जिल्हा न्यायालय नेवासा येथे मुले ताब्यात मिळणेबाबत अर्ज दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ ने माझ्या विरूध्द व माझ्या आई वडील व भावा विरूध्द आरोपी क्र.२ च्या मुलाला म्हणजेच माझ्या पतीला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याबाबत गुन्हा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या गुन्हयाचे दोषारोप पत्र न्यायालयात दाखल आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ ने माझ्या विरूध्द आत्महत्येस प्रवृत्त केले बाबतची केस दाखल केल्यानंतर मी आरोपी क्र.२, सोपान महापौर, सागर महापौर, गोरख एकनार, संतोष एकनार, उषा तेजीराम वाघडकर, अनिता आरूण सुपेकर, सुनिता गोरख एकनार यांच्या विरूध्द भा.द.वि कलम ४९८- अ प्रमाणे केस दाखल केली.

**न्यायालयाकडे इतर कामकाज असल्यामुळे उर्वरीत उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब..**

श्रवणोत्तर स्विकृती,

PRANITA RITESH SUGAONKAR Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR Date: 2025.11.24 16:51:46 +0530

दिनांक :- २४/११/२०२५

(डॉ. पी. आर. सुगांवकर)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, नेवासा.